# जिल्हाधिकारी कार्यालय, बीड

क्रमांक : क्र.आरबी/डेस्क/३/कावि-३१५-२०१७

दिनांक. २७ जुन २०१७.

## परिपत्रक

बीड जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढत असल्याचे निदर्शनास येत आहे. काही प्रकरणातुन असे निदर्शनास आले आहे की पुर्णत: शेतीवर अवलंबुन असलेले शेतकरी कुटूंबामध्येच आत्महत्येचे सारख्या घटना घडत आहेत. त्याअनुषंगाने जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटूंबाकरीता दिलासा राबविण्याचे जिल्हा प्रशासनाने निश्चित केले आहे. सदर कार्यक्रमांतर्गत आत्महत्याग्रस्त कुटूंबातील सदस्यांच्या आवश्यकते नुसार त्यांना शासनाच्या विविध विभागामध्ये सुरु असलेल्या योजनांचा लाभ देवुन शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंबाला पुन्हा आपल्या पायावर उभे करण्याचे जिल्हा प्रशासनाने निर्णय घेतला आहे. त्याअनुषंगाने तालुक्यातील आत्महत्याग्रस्त कुटूंबाचा सर्वेक्षण करण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांच्याअध्यक्षतेखाली तीन ग्रुप तयार करण्यात यावेत.

तसेच जिल्ह्यातील शेतक-यांच्या आत्महत्या रोखण्याकरीता आत्महत्याग्रस्त गांवात बळीराजा समिती गठीत करण्याचे निश्चीत केले आहे. सदर समितीची कार्यकारणी पुढिल प्रमाणे असणार आहे. १. सरपंच, अध्यक्ष २. पोलीस पाटील सदस्य सचिव ३. तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष सदस्य ४. तलाठी निमंत्रक ५. ग्रामसेवक सदस्य ६. कृषी सहायक सदस्य ७. अंगणवाडी सेविका ८. आशा वर्कर ९. गावातील प्रतिष्ठीत शेतकरी एक १०. सामाजिक संस्थेचे अध्यक्ष, भजनी मंडळाचे सदस्य ११. माजी सैनिक व निवृत्त शिक्षक (असल्यास) याप्रमाणे बळीराजा समिती तातडीने गठीत करुन संबंधीत तलाठी तहसिलदार यांना सदर समितीची माहिती सादर करतील. तसेच गठीत बळीराजा समितीचे कार्य पुढिल प्रमाणे निश्चित करण्यातआलेले आहे. सदर समिती मार्फत गावातील तणावग्रस्त शेतकरी कुटूंब शोधुन त्यांची माहिती संबंधित तहसिलदार यांना सादर करतील तसेच तालुकास्तरीय समितीच्या मार्गदर्शनात जिल्हा प्रशासन राबवित असलेला कार्यक्रम दिलासा च्या माध्यमातुन शासनाच्या विविध विभागामध्ये सुरु असलेल्या योजनांचा लाभ तणावग्रस्त शेतकरी कुटूंबाला देवुन समुपदेशन करुन सदर कुटूंबातील सर्व सदस्यांना तणाव मुक्त करणे आवश्यक आहे. या उद्देशाने खालील प्रमाणे उपाययोजना करणे आवश्यक आहे.

. . . . .

## //बळीराजा यांना समुपदेशनाकरीता दशसुत्री कार्यक्रम //

1. **शेतक-यासाठी अन्नसुरक्षा योजना :-**
तालुक्यातील प्रत्येक गावातील शेतकरी या योजनेपासुन वंचीत राहणार नाही यांची दक्षता घ्यावी व दरमहा सर्व शेतक-यांना धान्य मिळते किंवा नाही यांची खात्री करावी.

2. **शेतक-यांच्या आरोग्यविषयक अडचणी सोडविण्यासाठी आरोग्य शिबीर (राजीव गांधी जीवनदायी योजनांची प्रभावी अंमलबजावणी):-**
दुर्धरआजारग्रस्त शेतक-यांना राजीव गांधी जिवनदायी योजनेचा लाभ मिळवून देणे. त्याकरीता दरमहा प्राथमिक आरोग्य केंद्रावर गांव निहाय शेतक-यांचे आरोग्य तपासणी शिबीरे आयोजित करावे. त्यामध्ये दुर्धर आजारग्रस्त शेतकरी आढळल्यास त्यांना जिल्हास्तरावरील जिल्हा सामान्य रुग्णालय येथे उपचारा करीता पाठवावे. त्याबाबतची माहीती जिल्हा आरोग्य अधिकारी यांना पाठवावी.

3. **संरक्षित जलसिंचन (मागेल त्याला विहीर व शेततळयाची योजना) :-**
प्रत्येक शेतक-याला ओलीताच्या सोई सुविधा होण्याकरीता ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत मागेल त्याला विहीर व शेततळ्याची योजना प्रभावीपणे राबविण्यात यावी. तसेच जलयुक्त शिवार अभियाना मध्ये संरक्षित ओलीताच्या सर्व सुविधा करण्यासाठी निर्णय लवकर देणे. त्याच प्रमाणे कृषी विभागा मार्फत जलसिंचनाची साधने उपलब्ध करुन देणे.

4. **विज जोडणी - मागेल त्याला विज जोडणी / सोलर उर्जेसाठी प्रयत्न :-**
प्रत्येक शेतक-याला विज पुरवठा होईल या दृष्टीने नियोजन आराखडा तयार करणे.

5. **सामुहिक विवाह सोहळयाचे आयोजन :-**
शेतक-यांच्या मुला-मुलींच्या विवाहाकरीता सामुहिक विवाह सोहळे सेवा भावी संस्थाच्या माध्यमातुन करण्यात यावे. तसेच **एक गांव एक तिथी** उपक्रम राबविण्यात भर देण्यात यावा.

6. **प्रत्येक गांवाकरीता / अधिकारी / कर्मचारी दत्तक योजना :-**
**आत्महत्या मुक्त गांव** करण्याच्या अनुषंगाने तालुक्यातील प्रत्येक अधिकारी / कर्मचारी यांना प्रत्येक गांव दत्तक देणे. सदर अधिकारी / कर्मचारी यांनी गांवक-यांशी समन्वय साधुन गांवातील सर्व शेतक-यांनी **आत्महत्या मुक्त गांव** करण्याचा संकल्प करावा. करीता गांवाला वारंवार भेटी देणे त्याबाबतचा अहवाल तालुकास्तरावर सादर करणे.

7. **पशुसंवर्धन योजनांची प्रभावी अंमलबजावणी:-**

ग्रामस्तरीय समितीने गांवक-यांशी समन्वय साधुन गांवातील सर्व शेतक-यांच्या पशुधनाला लागणा-या चा-याबाबत शेतक-यांना नियोजन करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन करणे. पशुसंवर्धन विभागा अंतर्गत येणा-या **वैरण विकास योजना** करीता अनुदान तत्वावर बियाणे वाटपाची माहिती शेतक-यांना देणे.

8. **कौशल्य विकास व उद्योजकता विभाग :-**

शेतक-यांच्या मुलांकरीता रोजगाराभिमुख कौशल्य विकास कार्यक्रम राबविणे. तसेच तालुकास्तरावर शेतक-यांच्या मुलांकरीता रोजगाराभिमुख कौशल्य विकास पर मार्गदर्शन व प्रशिक्षण केंद्र सुरू करावी.

9. **मागेल त्याला कर्ज :-**

मागेल त्याला कर्ज, या शिर्षकान्वये जिल्ह्यातील सुशिक्षित बेराजगार युवकांना गृह उद्योग / व्यवसायाची उभारणी करण्याकरीता कर्ज उपलब्ध करुन देणे. शेतक-यांना पिक कर्ज व पिक कर्जाचे पुनर्गठन करणे जिल्ह्यातील शेतक-यांच्या कर्जामध्ये अधिकाधिक शिथीलता आणून शेतक-यांना दिलासा मिळेल असे धोरण राबविणे.

10. **लोक सहभागातुन विकास :-**

सेवा भावी संस्था, कृषी विकास व मार्गदर्शन गट, दानशुर व्यक्ती यांच्या सहकार्याने ग्रामस्तरीय समितीने गांवातील शेतक-यांसाठी शेती विषयक मार्गदर्शन व शेतकरी विकास कार्यक्रम राबविण्यात यावे.

. . . . . . .

तसेच ग्रामस्तरीय बळीराजा समिती गांवातील तणावग्रस्त शेतकरी कुटूंबाला आवश्यकतेप्रमाणे योजनांचा लाभ देण्यासाठी व समुपदेशन करण्यासाठी समितीच्या वतीने सरपंच व तलाठी हे महिन्याच्या १५ व १  तारखेला ग्रामस्तरावर सभा बोलावुन सदर सभेमध्ये गावात सामुहीक विवाह सोहळा आयोजित करणे बाबत निर्णय घेणे तसेच तणावग्रस्त कुटूंबाचा आढावा घेवुन वरील कार्यक्रम राबविण्याबाबत निर्णय घेणे तसेच शासनाच्या विविध विभागा अंतर्गत सुरु असलेल्या योजनांचा लाभ तणावग्रस्त शेतक-यांना देण्याबाबत तालुकास्तरीय समितीकडे प्रस्तावीत करणे. तसेच संबंधित तहसीलदार हे उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समितीचे आयोजन करतील व प्राप्त सर्व प्रस्तावांवर निर्णय घेतील व शासनाच्या विविध विभागा अंतर्गत सुरु असलेल्या योजनांचा लाभ सदर तणावग्रस्त शेतकरी कुटूंबाला देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करतील. तसेच तणावग्रस्त शेतकरी कुटूंबाला लाभ मिळाला किंवा नाही याबाबत महीन्यातील प्रत्येक आठवड्याला प्रत्यक्ष आढावा घेतील. जर एखाद्या तणावग्रस्त शेतकरी कुटूंबाला शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी दिरंगाई करीत असतील किंवा इतर कारण असल्यास त्याबाबतची माहिती या कार्यालयास  सादर करावी.

एम.देवेंदर सिंह (भा.प्र.से.)

जिल्हाधिकारी, बीड

# गांवक-यांचा संकल्प

आम्ही ......................................... या गावातील गावकरी ग्रामदेवतेला व कुटूंबाला स्मरुन संकल्प करतो की, दुष्काळ, नापिकी किंवा आर्थिक संकटामुळे आम्ही कधीच खचून जाणार नाही. आत्महत्या करणे हा कुटूंबाला व गावाला कलंक असून तो आम्ही कधीही लागू देणार नाही, याची आम्ही ग्वाही देतो. आमच्या गावातील शेतकरी, शेतमजूर व इतर कोणीही आर्थिक संकटात सापडल्यास आम्ही सर्व मिळून त्यास मदतीचा हात देऊ आणि स्वाभिमानाने जीवन जगण्याचा प्रयत्न करु.

आत्महत्या करणे हे समस्येचे उत्तर नसून ती अनेक समस्याची सुरुवात आहे. त्यामुळे आम्ही अशी शपथ घेतो की, आम्ही कधीच आत्महत्या करणार नाही अथवा आमच्या गावातील कुणास आत्महत्या करुही देणार नाही. आम्ही सारे मिळून आमचे गाव ‘आत्महत्या मुक्त’ गाव करण्याचा संकल्प करीत आहोत.